मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-३/२६८/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/७८३/२०१५ दि.२८/०७/२०१५
२. श्री एम.एम.लोखंडे, ग्रामविकास अधिकारी तिसगाव यांचा खुलासा दिनांक ०९/०९/२०१५
३. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१२३७/२०१५ दिनांक १७/१२/२०१५.
४. या कार्यालयाकडील सादरकर्ता अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१२३७/२०१५,दिनांक १७/१२/२०१५.
५. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्र.विशा-४/खाचौ/सी.आर/६/२०१६, दिनांक ३०/०१/२०१६
६. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क साप्रवि-२/ग्रापं-६/३१८/२०१७ दि.२३/०५/२०१७.
७. श्री एम.एम.लोखंडे, ग्रामविकास अधिकारी तिसगाव यांचा खुलासा दिनांक १५/०६/२०१७
८. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/९१९/२०१९ दि.२७/०९/२०१९
९. मा. अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अपिल क्र.३९/२०२० निकाल क्र.२२७६७, दिनांक २२/११/२०२१.
१०.अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र. डिईएन-२०२६/प्र.क्र.५५/आस्था-१२ दिनांक १२/०६/२०२६ समवेत मा.राज्यमंत्री( ग्रामविकास व पंचायत राज) यांचेकडील अपिल आदेश दिनांक १०/०६/२०२६.

श्री एम.एम.लोखंडे, हे तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत तिसगाव,ता.पाथर्डी येथे कार्यरत असतांना त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ८ च्या आदेशान्वये श्री एम.एम.लोखंडे, यांना समयश्रेणीतील निम्नस्तरावर आणणे ही शिक्षा अंतिम करणेत आलेली होती.

श्री एम.एम.लोखंडे, तत्कालीन ग्रामसेवक यांनी इकडील संदर्भ क्रमांक ८ च्या आदेशा विरुध्द मा . अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्र. ९ अन्वये श्री लोखंडे यांचे सदरचे अपील अमान्य करण्यात आल्याने शिक्षेचे आदेश कायम राहिलेला आहे.

उक्त नमुद शिक्षेच्या आदेश व मा.अपर आयुक्ताचे निकालाचे अनुषंगाने श्री.लोखंडे यांनी मा.राज्यमंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी होवून संदर्भ क्र.१० चे पत्रान्वये मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दि २२ एप्रिल २०२६ या कार्यालयास दिनांक २९/०६/२०२६

..२

रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

१. अपिलार्थी श्री एम.एम.लोखंडे, ग्रामसेवक यांचे अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याचे दि.२७.०९.२०१९ रोजीचे आदेश व अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे दिनांक १८.११.२०२१ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहे.
३. श्री लोखंडे यांचेवरील 'समय श्रेणीत निम्नस्तरावर आणणे' ही शास्ती रद्द करुन याऐवजी "दोन वेतनवाढी पुढील वेतनावर परिणाम होणार नाहीत अशा रीतीने तात्पुरत्या स्वरुपात बंद करणे" अशी सुधारित शास्ती देण्यात येत आहे.
४. निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ 'कर्तव्य कालावधी' समजण्यात यावा.

सदर आदेशाची नोंद श्री एम.एम.लोखंडे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत तिसगाव,ता.पाथर्डी यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०८०५०६०११८ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 07-08-2026 21:06:21
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री एम.एम.लोखंडे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत तिसगाव,ता.पाथर्डी
द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा.(निलंबन मुख्यालय) / नेवासा

२/- सदरचा आदेश श्री.लोखंडे यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेण्यात येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत:- कार्यासन-०१/०२,ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.

स्वाक्षरीत/-
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर